सोमवार दि.१ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता

बीड
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# वंचितची लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर ; ११ जणांचा समावेश

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली. या उमेदवार यादीमध्ये एकूण ११ जणांचा समावेश आहे.वंचितच्या पहिल्या यादीप्रमाणेच दुसऱ्या यादीतही समाजातील सर्व जाती-घटकांना स्थान मिळेल, याची काळजी प्रकाश आंबेडकर यांच्याकडून घेण्यात आली आहे. त्यामुळे वंचितच्या दुसऱ्या यादीतही लोकसभा उमेदवारांच्या नावापुढे त्यांची जात नमूद करण्यात आली आहे.

वंचितच्या पहिल्या लोकसभा उमेदवार यादीत ८ जणांचा समावेश होता, तर दुसऱ्या उमेदवार यादीत ११ जणांचा समावेश आहे. त्यामुळे वंचितने आतापर्यंत लोकसभेचे १९ उमेदवार जाहीर केले आहेत. महाविकास आघाडीसोबत युतीची बोलणी सुरु असताना प्रकाश आंबडेकर यांनी लोकसभेच्या २७ मतदारसंघांमध्ये वंचित बहुजन आघाडीकडे विजय मिळवण्याइतकी ताकद असल्याचे सांगितले होते. त्यानुसार आतापर्यंत वंचितने १९ लोकसभा उमेदवार जाहीर केले आहेत.

हिंगोली - डॉ. बी. डी. चव्हाण - बंजारा
लातूर - नरसिंहराव उदगीरकर - मातंग
सोलापूर - राहुल काशिनाथ गायकवाड - बौद्ध
माढा - रमेश नागनाथ बारसकर - माळी (लिंगायत)
सातारा - मारुती धोंडीराम जानकर - धनगर
धुळे - अब्दुर रहमान - मुस्लीम
हातकलंगणे - दादासाहेब पाटील - जैन
रावेर - संजय पंडीत ब्राम्हणे - बौद्ध
जालना - प्रभाकर देवमन बकले - धनगर
मुंबई उत्तर मध्य - अबु हसन खान - मुस्लीम
रत्नागिरी सिंधुदुर्ग - काका जोशी - कुणबी

वंचित बहुजन आघाडीने तब्बल १९ जागांवर उमेदवारांची नावे जाहीर केल्याने महाविकास आघाडीला त्याचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. कारण वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडी या दोघांना महायुतीच्या उमेदवारांचा पराभव करायचा आहे. महायुतीच्या उमेदवाराचा पराभव करणं ही दोघांची प्राथमिकता आहे. यासाठी दोघांनी एकत्र येणं आवश्यक होतं. पण जागावाटपात एकमत न झाल्याने आता प्रकाश आंबेडकर यांनी वेगळा मार्ग निवडला आहे. पण त्यांच्या या मार्गाचा सर्वाधिक फायदा भाजपला होण्याची शक्यता आहे. तसेच महाविकास आघाडीला त्याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर गंभीर आरोप केले. नाना पटोले यांनी भाजपशी छुपी युती केली आहे. कोल्हापूर आणि नागपूर मतदारसंघात वंचितने काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. मात्र, नागपूरमध्ये काँग्रेसचा उमेदवार विजयी होणार, यासाठी ते दु:खी आहेत. नितीन गडकरी पराभूत होतील, याचे दु:ख नाना पटोले यांना झाले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी दोन जागांवर पाठिंबा द्यावा, यासाठी डायरेक्ट आमच्यासाठी संपर्क केला. याचे दु:ख पटोलेंना झाले आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. तसेच नाना पटोले यांनी भंडारा-गोंदियातून लोकसभा निवडणूक लढता येणार नाही, असे पक्षाला सांगितलं. नाना पटोलेंनी लढण्यास कशामुळे नकार दिला. याचे खरे कारण आज आपणा सर्वांसमोर आले आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.




# भिगवण- राशिन रोडवरील राजेगाव फार्म येथील चेक पोस्ट ठेकेदाराने टाकली उखडून

## चेक पोस्टच सुरक्षित नाही ; शासकीय मालमत्तेचे नूकसान केल्याने ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

भिगवण - राशिन रोडवरील राजेगाव फार्म ता.दौंड येथील पोलीस चेक पोस्ट ठेकेदाराने उखडून टाकली आहे. रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे काम चालू असताना चेक पोस्ट व्यवस्थित खोलून काढायला पाहिजे होती पण ती जे.सी.बी.ने काढून मोडून बाजूला फेकून दिली आहे.कोट्यावधी रुपयांचा रस्ता करताना स्वत:ला पैसे कमविण्याच्या नादात ईकडे मात्र शासकीय मालमत्तेचे नूकसान केले आहे.दौंडचे पोलीस दुर्लक्ष का करत आहेत.



हिच चेकपोस्ट सर्वसामान्य नागरिकांनी काढली असती तर त्याला लगेच गुन्हा दाखल करून अटक झाली असती.मग या ठेकेदाराला अभय कशासाठी हे न सुटणारे कोडे आहे. सदरची चेक पोस्ट ही दौंड पोलीस स्टेशनच्या नियंत्रणाखाली असून पुणे जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला असून चार तालुके आणि तिन जिल्ह्याच्या सीमेवरील हा रस्ता असून तो अतिशय महत्त्वाचा रस्ता आहे.कारण याच ठिकाणी नाकाबंदी केली तर चोरटे,अरोपी आणि अवैद्य वाहतूकीच्या गाड्या पकडण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा असून या चेक पोस्टवर पूर्वी एक पोलीस कर्मचारी ड्युटीवर होते. त्यामुळे या चेक पोस्ट चा फायदा चोरीस आळा बसण्यासाठी अतिशय महत्वाचा होता.या चेक पोस्ट वरती अनेक दोन नंबर धंद्यावाल्यांचे पितळ उघडे झाले आहे. कोविड च्या काळात या रस्त्यावर चेकपोस्ट मध्ये पोलीस छावनी टाकण्यात आली होती.अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील पोलीस अधिकारी,कर्मचारी संयुक्त तैनात होते.आजही शेजारीच असणाऱ्या एसटी पुलाचे सुरक्षेसाठी हि चेकपोस्ट तितकीच महत्वाची आहे.आणि याच चेक पोस्टची दुरावस्था आणि नासधूस करून टाकली आहे.त्यामुळे या मुजोर ठेकेदारावर शासकीय मालमत्तेचे नूकसान केले आहे म्हणून गुन्हा दाखल करून कारवाई होणार का ? याकडे खानवटे,राजेगाव फार्म परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# महानगरपालिकेने खोदलेला खड्डा झाला जीवघेणा,तरी महानगरपालिका लक्ष देईना

लोकनेता न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर । सुनील वैद्य

महानगरपालिकेच्या वतीने सिडको भागातील आझाद चौक येथे ड्रेनेजच्या कामासाठी खोदलेला खड्डा वाहनधारकांचा जीव घेण्यासाठी बनवला की काय असे चित्र दिसत आहे .संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देऊनही अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष.



छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने सिडको भागातील कीर्ती हाऊसिंग सोसायटी कमानीच्या समोरील ड्रेनेज लाईन मागील काही महिन्यापासून चोकोप झालेली होती . या लाईनचे काम करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने मुख्य रस्त्यावर गड्डे करण्यात आले आहे . पण तेच गड्डे आता वाहानधारकांसाठी जीव घेणे झाले आहे .पंधरा दिवसापूर्वी खोदण्यात आलेले खड्डे बुजण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना अद्यापही वेळ मिळाले नाही .या रस्त्याने चार चाकी व दूध चाकी वाहनधारकांना जो मोठे धरून प्रवास करावा लागत आहे . याची माहिती संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली होती .संबंधित अधिकाऱ्याने तात्काळ बंद पडलेले काम चालू करतो .असे आश्वासन दिले होते . आठ दिवस उलटून गेले तरी या ठिकाणी कोणतेही अधिकारी कर्मचारी फिरकले नसल्याने मुख्य रस्त्यावरील खड्डे जशाच तसे आहे . या गड्ड्याच्या परिसरातून चार चाकी धारकांना वाहन चालवणे शक्य नाही नजर थोडी जरी इकडे तिकडे झाली तर सरळ वाहन खड्ड्यात जाऊन अपघात होऊ शकतो अशी परिस्थिती झालेली आहे .अपघात झाल्यास जीवदेखील जाऊ शकतो .अशी परिस्थिती असताना देखील संबंधित मनपा अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे परिसरातील नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे .महानगरपालिकेने खोदून ठेवलेले खड्ड्यांचे काम तात्काळ करण्यात यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे .

## विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात वादळी पावसाचा इशारा कायम

लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे (वृत्तसंस्था)

सुर्य आग ओकत असल्याने राज्यात उन्हाची ताप चांगलीच वाढली आहे. दिवसा उन्हाच्या झळा असह्य ठरत असून रात्री देखील उष्ण ठरत आहेत. अकोलामध्ये उच्चांकी ४२.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर आज विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यासह देशाच्या हवामानात पुन्हा एकदा बदल पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी तापमानात वाढ होत आहे तर काही ठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे.राज्यात काही ठिकाणी आज पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुढील २४ तासात राज्यात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर इतर ठिकाणी तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता आहे. विदर्भातील अमरावती, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा आहे.

## चारोळी

आसूसलेल्या सांजवेळी
ती लेकराची वाट पाहते
थकलेल्या देह असूनी
त्याच्याच सौख्याचे गीत गाते .

रंजना सानप
मायणी (सातारा)

## डॉ.अमोल चाटे यांच्या कडून वाढदिवसाच्या निमित्त निराधाराचे मोफत उपचार व तपासणी कौतुकास्पद कार्य!





लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

स्वच्छ चारित्र्य, निस्वार्थी मन, सहकार्याची भावना प्रत्येकाचा जीवनप्रवास हा जन्मापासून मृत्यू कडून जगण्याकडे असतो,आपत्कालीन रुग्णवहिका १०८ (इतत्र)चे जिल्हा व्यवस्थापक श्री, अविनाश राठोड यांच्या वाढदिवसाच्या निमित्त परळी येथील रुग्णवहीका १०८, चे वैद्यकीय अधिकारी डॉ, अमोल चाटे यांच्याकडुन एक अनोखा उपक्रम राबवून मानव समाजात एक आदर्श निर्माण करत,मंदिर परिसर, रेल्वे स्थानकात, बस स्थानक, रस्त्यालागत असणारे भिक्षा मागनारे, अंध, अपंगत्व जीवन जगणारे यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करून उपचार करण्यात आले, हे कार्य सामाजिक जबाबदारी नसून मानव समाजाला एक आदर्श घेण्यासाठी उपयुक्त ठरणारे कार्य समजावे लागेल, डॉ, अमोल चाटे हे सामाजिक,धार्मिक या कार्यात अग्रेसर असतात त्यांचा फोन चोवीस तास सुरु असतो,रिंग वाजली असता आपल् कर्तव्य पार पडतात,व आपल्या रुग्णवाहिकेचे सायरन वाजवत एकदम अल्प वेळेत घटनास्थळी हजर असतात दिवस असो या रात्र अपरात्री वेळेच भान न ठेवणारे परळी तालुक्यातील ग्रामीण भाग असो या शहरी कुठेही विचित्र अपघात घडला, जखमीना तत्पर सेवा मृत्यू झालेल्याना आपल्या गावी पोहचवन्यास सक्षम असतात, आजच्या या वर्तमान काळात कोणाच्या युवा मित्राचा वाढदिवस साजरा करणे म्हणजे अमाप मध्यपान करणे, चौकात फटाके फोडणे, गाड्या वर केक कापत रोडवर चौका चौकात गोंधळ घालणे,हे बंद झाले पाहिजे व गरजूवन्त लोकांना मदत करणे, वस्त्रदान करणे,अन्नदान करणे, हा मानव धर्म पाळला जावा असा आदर्श अंगीकार करून बोध घ्यायला पाहिजे अनर्थ आर्थिक नुकसान करण्यापेक्षा शालेय उपयोगी साहित्य गरजवंत विदयार्थी यांना साहित्य वाटप करावे, असे मार्गदर्शन करत आपत्कालीन रुग्णवाहिका १०८(इतत्र)चे बीड जिल्हा व्यवस्थापक श्री अविनाश राठोड यांच्या वाढदिवसाच्या निमित्त,डॉ,अमोल चाटे यांनी आपल्या कार्य पद्धतीने अनोखा वाढदिवस साजरा केला असता त्यांचे सर्व स्तरातून या अनोख्या कार्याचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे, यावेळी त्यांचे सहकारी मित्र परिवार रुग्ण वाहिका चालक, धीरज साखरे, अमर मुंडे, मकरंद घुले असे अनेक मान्यवर उपस्थित होते,

# अवैध केमिकल मिश्रीत बायो डिझेलची सर्रास विक्री; ३१ हजार लिटर साठा जप्त

## सदरचे कारवाईतून कायम उच्चाटन होणार का असा सामान्यांचा प्रश्न



लोकनेता न्यूज नेटवर्क


अनिलकुमार गोठी । मलकापूर

राष्ट्रीय व राज्य मार्गालगत राजरोसपणे अवैध बायो डिझेलची सर्रास विक्री होत आहे. पोलीस विभागाने केलेल्या मोठया कारवाईत तब्बल ३१ हजार लिटर इंधन साठा जप्त करण्यात आला आहे. यावेळी ३४ लाखांचा मुद्धेमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सुनील कडासने, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथकांनी ही कारवाई केली. चिखली 'एमआयडीसी', मलकापूर व दसारखेड एमआयडीसी येथे एकाचवेळी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३१ हजार ४०५ लिटर अवैध बायोडिझेल सह एकूण ३४ लाख २० हजारचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चिखली येथील किसान बायोडिझेल, काठोडे ट्रेडर्स, मलकापूर येथील हॉटेल निसर्ग व हॉटेल सहयोग जवळ, पद्मने महाराज शेताजवळ, हॉटेल अमन जवळ छापे घालण्यात आले.या प्रकरणी आरोपी सचिन लोखंडे, ज्ञानेश्वर काठोडे राहणार चिखली, नफिस खान वडणेर भोलजी नांदुरा, हेमंत काचकुरे तालासवाडा मलकापूर, परमेश्वर वनारे माकनेर ता मलकापूर, शेख जावेद, मोहमद जिया मो युसूफ, गुरफान खान गफार खान राहणार मलकापूर याना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या विरुद्ध भादवी कलम २८५, जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ नुसार कारवाई करण्यात आली आहे.बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, नांदुरा परिसरात केमिकल मिश्रित अवैध बायोडीजल पंप धारकांचा व्यवसाय जोमात असून यापूर्वीही अनेकदा थातूरमातूर कारवाई झाली असल्याचे नाकारता येत नाही. अनेकदा हे पंप प्रशासनाकडून सील सुद्धा करण्यात आले मात्र प्रशासनाची कुठलीही भीती न बाळगता सील केलेलें पंप पुन्हा सुरूच असल्याचे दिसून आले. तरीही स्थानिक गुन्हे शाखेकडून करण्यात आलेली ही कारवाई महत्वपूर्ण आहे. मात्र कारवाई करण्यात आलेल्या या अवैध व्यवसायाचे कायम उच्चाटन करण्यात प्रशासन यशस्वी ठरणार की अपयशी हे पाहणे आता गरजेचे आहे.

संपादकीय

# जिद्द, धाडसाचे ओघवते कथन!




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

भारताच्या संख्येने कमी असणाऱ्या राजकारणी महिलांमधील एक प्रमुख नाव वृंदा करात. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रमुख नेत्यांपैकी त्या आहेत. त्या राज्यसभेच्या माजी सदस्य आणि ङ्गऑल इंडिया डेमोक्रॅटिक विमेन्स असोसिएशनफच्या संस्थापकांपैकी एक आहेत.त्यांचा पक्षाच्या पॉलिटब्युरोत समावेश आहे. त्यांनी १९७५-१९८५ या दहा वर्षांच्या काळातील आठवणी या पुस्तकात कथन केल्या आहेत. १९७५चा ऑगस्ट महिना. आणीबाणी लागून जेमतेम दोन महिने झालेले.

उत्तर दिल्लीच्या कमलानगरमधील लहानशा खोलीत कम्युनिस्टांच्या एका गटाची बैठक सुरू आहे. उजेडासाठी छोटासा तेलाचा दिवा आहे. त्या गटात तेरा पुरुष आणि केवळ एकच महिला आहे. ते सगळे पुरुष बिर्ला कॉटन टेक्टाइल मिलमधील कामगार आहेत.त्यांच्यातील ती एकमेव महिला नुकतीच लंडनमधील विमान कंपनीतील चांगल्या पगाराची नोकरी सोडून आणि नाट्यशिक्षण घ्यायचे स्वप्ने तेथेच सोडून भारतात आली आहे. त्या काळात कम्युनिस्ट पक्षाचे काम करताना, केव्हाही अटक होण्याची शक्यता असल्यामुळे तिला वेगळी ओळख देण्यासाठी मूळ नाव बदलायला सांगितले जाते. त्यानुसार वृंदाची रीटा होते. येथपासून या आठवणींची सुरुवात होते. नंतर आपण वाचतच जातो.हे पुस्तक आपल्याला १९७५-१९८५ या कालावधीतील महत्त्वाच्या घटना सांगू लागते. आजही आणीबाणी हे भारतासाठी दुःस्वप्नच आहे. सध्याचे वास्तव त्याहीपेक्षादेखील भयानक असले तरी आणीबाणीचा विसर पडणे अवघडच आहे.आणीबाणीच्या काळातले गरिबांचे विस्थापन, कापड गिरण्यांतील कामगारांचा संप, हुंडा प्रथेविरुद्ध झगडा, यांबरोबरच इंदिरा गांधींच्या हत्येनंतर झालेला शिखांविरुद्धचा भयानक हिंसाचार अशा अनेक घटनांचे कथन करात यांनी पुस्तकात केले आहे.आणीबाणी सुरू झाल्यानंतरच्या दहा वर्षांतील कम्युनिस्ट पक्षाच्या एक नेत्या आणि त्याबरोबरच स्त्रीवादी चळवळीतील अग्रणी, म्हणून आपली- वृंदा करात यांची- जडणघडण कशी झाली, ते त्यांनी ओघवत्या शैलीत सांगितले आहे.पुस्तक वाचताना एका तरुणीत झालेला मोठा बदल आपल्याला कळतो. त्याबरोबरच तिची जिद्द, चिकाटी आणि धाडस यांचीही ओळख होते. सुस्थितीतील तरुणीला दिल्लीतील वस्त्यांमधील शहरी कामगारांच्या जीवनाचे वास्तव कसे उमगते आणि त्यांना अधिक चांगल्या जिण्यासाठी कसे संघटित केले जाते, याचीही माहिती मिळते.वृंदा करात यांची लिहिण्याची धाटणी विलक्षण आहे. १९७५ बाबत बोलतात, तेव्हां जणू काही त्या १९७५ मध्येच आहेत, असे वाटायला लागते. त्यांच्या कहाणीचा पट आपल्यासमोर आकर्षकपणे एखाद्या कृष्णधवल चित्रपटासारखा साकार होतो.एरवी आठवणी सांगताना वर्तमानाचे भान कायम ठेऊन, ङ्गत्या काळातफवगैरे शब्दांत त्या सांगितल्या जातात. पण करात मात्र त्या १९ वर्षांच्या असतानाच्या घटनांचे वर्णन करतात, तेव्हा मधली पन्नास वर्षे विसरूनच जातात.त्यामुळे या आठवणी जणू त्या वयाच्याच, ताज्या टवटवीत, तरुणीच्याच वाटतात. पुस्तकात अनेक ऐतिहासिक घटना आपल्यापुढे उलगडत जातात. तशा त्या वाचकाला माहीत असतात, तरी वृंदा त्या अशा प्रकारे वर्णन करतात की, त्यांचा आधुनिक भारताशी असलेला संबंध सहजच उलगडत जातो. त्या बदलत्या काळातील कम्युनिस्ट पक्षाच्या मोठ्या नेत्यांबरोबरच देशातील अन्य प्रमुख नेत्यांबाबतही करात लिहितात, त्यामुळे त्यांच्या कथनात एकसुरीपणा येत नाही.फफ्एज्युकेशन फॉर रीटाफफ या नावाप्रमाणेच या पुस्तकाच्या वाचकांनाही यातून बरेच काही शिकायला मिळेल. अर्थात त्यांची तयारी मात्र असायला हवी. सर्वसामान्य महिलांच्या जीवनात डोकावण्याची संधी वाचकाला मिळते. साध्या राहणीमध्येही त्यांची विचारसरणी मात्र कशी उच्च दर्जाची असते, ते उमगते. आपसूकच आता आपण काय करू शकतो, याचीही जाण येते.पुस्तकाचे मुखपृष्ठही वैशिष्ट्यपूर्ण तसेच अगदी जिवंत वाटावे, असे आहे. एका मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या, उजवा हात प्लॅस्टरमध्ये असलेल्या, वृंदा करात घोषणा देताना तेथे दिसतात. कोणत्याही क्षणी मोर्चाच्या घोषणा कानावर येतील, असे वाटायला लावणारे हे चित्र त्यातील मजकुराला साजेल असे बोलके आहे. हे छोटेखानी पुस्तक वाचण्याजोगे आहे.

# महागड्या विवाह समारंभांचे त्रांगडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क



महागडे विवाह समारंभ ही आपल्या समाजात नवरीत रूढ होत आहे. अनुकरणप्रिय समाजाच्या शेवटच्या टोकापर्यंत ते रुजल्यामुळे विवाह समारंभांवरील वारेमाप खर्च सामान्यांवर कर्जाचा डोंगर उभा करतो, याच्या सामाजिक, आर्थिक परिणामांचा विचार करावा.महागडे विवाह समारंभ ही आपल्या समाजात नवरीत रूढ होत आहे. अनुकरणप्रिय समाजाच्या शेवटच्या टोकापर्यंत ते रुजल्यामुळे विवाह समारंभांवरील वारेमाप खर्च सामान्यांवर कर्जाचा डोंगर उभा करतो, याच्या सामाजिक, आर्थिक परिणामांचा विचार करावा.उद्योगपती मुकेश अंबानी यांच्याकडे नुकत्याच झालेल्या शेकडो कोटींच्या लग्नपूर्व कार्यक्रमाची देशासह जगभर चर्चा झाली. त्यापूर्वी त्यांच्याच कन्या ईशा यांच्यासह प्रसिद्ध उद्योगपती सुब्रतो रॉय, कर्नाटकातील खाणसम्राट जनार्दन रेड्डी, पोलाद उद्योगातील नामवंत लक्ष्मी मित्तल यांच्या अपत्यांच्या शेकडो कोटींच्या खर्चाच्या विवाह समारंभांचीही चर्चा त्या-त्यावेळी झाली.खरेतर विवाह ही एक बाजारपेठ आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) या उद्योजकांच्या संघटनेने नोव्हेंबर २०२३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, 'भारतात २३ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२३ या काळात ३८ लाख विवाह होणार असून, त्यावर किमान ४.७४ लाख कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे.

२०२२च्या याच काळात ३२ लाख विवाह झाले होते, त्याद्वारे ३.७५ लाख कोटी रुपयांची उलाढाल झाली होती. २०२२ वर्षीपेक्षा २०२३मध्ये एक लाख कोटीने खर्चवाढ आहे.' या एकूण विवाहांपैकी सुमारे ५० हजार विवाह असे असतील की, ज्यात एकावर किमान एक कोटींपेक्षा जास्त खर्च होईल.याशिवाय सात लाख विवाह असे असतील, की ज्यात प्रत्येकी तीन लाख रुपयांपेक्षा कमी खर्च होतील. इतर ५० हजार विवाहांवर प्रत्येकी ५० लाख रुपये खर्च होतील. विवाहांमुळे अर्थव्यवस्थेला मदत होते आणि एक मोठी बाजारपेठ व आर्थिक उतरंड यातून उभी राहते, हा मुद्दा असला तरी त्याचे सामाजिक परिणाम लक्षात घ्यावेत.गेल्या पंधरा वर्षांत नवश्रीमंत वर्ग, सेलिब्रिटी यांच्याकडील विवाह समारंभाची, त्याचा डामडौल, त्यानिमित्ताने होणारे कार्यक्रम, त्यांचे स्वरूप आणि त्यामुळे आलेले हायप्रोफाईल स्वरूप याची विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांसह समाजमाध्यमांवरही तडाखेबंद चर्चा होते.यानिमित्ताने त्यांच्या संपत्तीचे होणारे प्रदर्शन हिमनगाचे टोक म्हणावे लागेल. त्यामुळे, त्यावर टिका केली तर यात तुमचे काय बिघडते. ते त्यांचा पैसा खर्च करतात, तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? असा प्रश्न नवतरुण विचारतील.वरवर बघता हा प्रश्न तार्किक आहे. मूल्यव्यवस्था हा कदाचित त्यांचा काळजीचा विषय नसेलही. कारण ते ज्या काळात जगतात, ज्या अर्थव्यवस्थेचा भाग आहेत, त्या काळात व्यक्तिवादी विचारसरणीत तळातल्या समाजावर काय परिणाम होईल? याचा विचार मागे पडणे स्वाभाविक आहे.

महात्मा गांधींनी वाराणसीला जेव्हा भेट दिली तेव्हा तेथील दागिने घालून आलेल्या श्रीमंत व्यक्तींवर त्यांनी जाहीरपणे त्यांच्यासमोर टीका केली होती. गांधींच्या भुमिकेनुसार आज आपण या नव्या श्रीमंत प्रदर्शनाचे विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे.श्रीमंतांनी आपल्या संपत्तीकडे विश्वस्त म्हणून बघावे, या गांधींच्या विचाराने आज फार कोणी वागणार नाही, हेही समजण्यासारखे आहे. पण आपल्या या वागण्याचा समाजातील तळातील वर्गावर काय परिणाम होईल? याचा विचार करावा.या विवाहाचा परिणाम हा होतो की, त्यांच्या खालच्या आर्थिक पायरीवर जे आहेत ते त्यांना 'रोल मॉडेल' म्हणून स्वीकारतात. तशा प्रकारे खर्च करतात. उद्योजक, सेलिब्रिटी, राजकारणी या विवाह समारंभात वापरलेल्या पद्धती, त्याचे व्यवस्थापन, खर्च यांचे अनुकरण करतात.किमान १०० कोटींवर खर्चाचे विवाह होण्याचे प्रमाण वाढेल. मूळ चिंता ही उच्चभ्रू वर्गाच्या महागाड्या विवाह समारंभांची नाहीतर ज्या सामान्यांना असे खर्च पेलवत नसताना त्यांना समाजातल्या बडेजावाच्या पोकळ संकल्पानांमुळे खर्च करावे लागतात, त्यांच्याबाबत आहे.प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षितच्या 'हम आपके है कौन' या एका चित्रपटाने विवाह व्यवस्था प्रचंड महागडी केली. त्याने ड्रेस डिझाईनपासून अनेक बाजारपेठा फुलवल्या. आज शहरी भागात आणि अगदी तालुक्यातसुद्धा विवाह समारंभानंतर स्वागत समारंभाचा पॅटर्न रूढ आहे.त्यासाठी काही लाख रुपयांचे पॅकेज असते. शिवाय, प्री-वेडिंग शूट प्रकार तर ग्रामीण भागातही रुजला आहे. पूर्वी ग्रामीण भागात अगदी शेतात, घरासमोर विवाह होत. छोटा मांडव टाकला जायचा. बैलगाडीने किंवा अन्य खासगी वाहनांनी वऱ्हाड यायचे.कमी खर्चात लग्नं व्हायची. आज मात्र शहरी, नवश्रीमंत वर्गाच्या अनुकरणाने गरिबांची फरफट होते, हा चिंतेचा विषय आहे. ग्रामीण भागातील नवश्रीमंत वर्गानेही संपत्तीचे प्रदर्शन चालवले आहे. विशेषतः ग्रामीण राजकीय नेत्यांनी त्याची सुरुवात केली. लोकांच्या संपर्काचे माध्यम म्हणून नेते अशा समारंभाना आवर्जून हजेरी लावतात.उद्योगपती, सेलिब्रिटींच्या लग्नाला जर पंतप्रधान, मुख्यमंत्री येतात; तर खेडुतांच्या समारंभात आमदार, खासदार, सभापती अपरिहार्य ठरतात. ते यावेत म्हणून लोक जीव काढतात. मग नेतेही समारंभातील मोठ्या गर्दीत जाऊन शुभेच्छापर भाषणे देतात. विवाहात जमणारी गर्दी आणि तेथे होणारा प्रचंड खर्च हा प्रतिष्ठेचा मानदंड झाल्याने, परवडत नसले तरी कर्जबाजारी होऊन लोक अनुकरण करतात.विवाह समारंभासाठी गार्डन मंगल कार्यालय, फार्महाऊस घेणे, स्वागत समारंभ ठेवणे हा पॅटर्न रुजला आहे. आपण तसे केले नाहीतर 'गरीब' ठरू, अशा समजुतीने कनिष्ठ मध्यमवर्गही भरडला जातो आहे. कनिष्ठ व निम्न मध्यमवर्ग कुटुंबाचा आज विवाहावरील खर्च दहा लाखांपुढे गेला आहे. तो करणे जीवावर येते, पण अनुकरण संस्कृतीपोटी करावाच लागतो, हेच खरे.यात सर्वात वाईट स्थिती ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी यांची होते. घरासमोर मांडव टाकून आता कोणीही लग्न करीत नाही. अगदी तालुक्यापेक्षाही छोट्या गावांच्या वेशीवर दिमाखदार लॉन मंगल कार्यालये दिसतात.बहुतांश लोकांची त्यांनाच पसंती असते. महागड्या शहरी विवाह समारंभाचे ते मिनी मॉडेल. वाजंत्री, मिरवणूक, घोडे नाचवणे, ड्रोन कॅमेऱ्यापासून सारे असते. अशी कार्यालये सगळ्या बाबींचा ठेका घेतात. लाखोंचे पॅकेजच असते.परवडत नसले गरिबांना ते स्वीकारावे लागते. पतसंस्था, बँकांचे कर्ज ज्या कारणासाठी वाटले जाते त्यात विवाह समारंभासाठी कर्ज हे महत्त्वाचे कारण असते. याचा सर्वात विदारक पैलू शेतकरी आत्महत्त्येच्या प्रश्नात दिसून आला. शेतकरी आत्महत्त्येचे आजपर्यंत जे अभ्यास झाले त्यात विवाहासाठी घेतलेले कर्ज हे एक कारण आढळले आहे.'दारिद्र्याची शोधयात्रा' या अभ्यासासाठी मी ग्रामीण महाराष्ट्रात फिरलो. त्यात लोक स्थलांतरित मजूर का होतात? याचा अभ्यास केला. तेव्हा विवाहासाठी ठेकेदाराकडून उचल घेतली जाते, ती फेडण्यासाठी मजूरकामाला जातात असे आढळले. सालगडी प्रथेत लग्नासाठी कर्ज काढून नंतर कामाला जे जातात त्यांना 'लग्नगडी' म्हटले जाते.श्रीमंतांच्या अनुकरणाचा हा रोग इतका संसर्गजन्य आहे की, त्याच्या नवजनरितीने समाजातील मोठा घटक बळीही पडतो आणि कर्जाच्या डोंगराखाली दबूनही जातो. हे विचारात घेवून समाजावर प्रभाव टाकणाऱ्या समाजघटकांनी आपल्या संपत्तीचे प्रदर्शन टाळले पाहिजे.अर्थात अशा समारंभांमुळे बाजारपेठ गती घेते, असाही मुद्दा मांडला जातो. पण या बाजारपेठेचे बळी हा खर्च न परवडत असलेला मोठा गरीब वर्ग आहे, हे लक्षात घ्यावे. त्यासाठी सामुदायिक विवाहाची चळवळ गतिमान करणे आणि त्याला प्रतिष्ठा देण्यासाठी प्रभावशील व्यक्तींनी त्यात आपल्या मुला-मुलींचे लग्नं लावून देणे यावर भर द्यावा. त्यामुळे विवाह सोहळ्यातील संपत्तीचे प्रदर्शन आणि गरिबांची फरफट थांबेल.

# अनुभवी, धाडसी अधिकाऱ्याचा गौरव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क



राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) महासंचालकपदी सदानंद दाते यांची झालेली निवड ही आतापर्यंत विविध जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांनी दाखवलेल्या कौशल्याची पोचपावती म्हणावी लागेल. महाराष्ट्रात त्यांनी विविध पदांवर काम करताना मिळालेली अनुभवाची शिदोरी त्यांना नवीन जबाबदारी पार पाडायला निश्चित उपयोगी पडू शकते.मुं बईवरील २६/११चा दहशतवादी हल्ला हा देशाच्या सार्वभौमत्वावर परकी भूमीवरुन झालेले आक्रमण होते. त्याला परतवून लावल्यानंतर सुरक्षा यंत्रणेत बदल करण्यात आले. राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) हीदेखील त्याचाच एक भाग. या हल्ल्याला परतवून लावण्यात मोलाची कामगिरी पोलिस अधिकारी सदानंद दाते यांनी बजावली होती. त्यांचीच नेमणूक या 'एनआयए'च्या महासंचालकपदी होणे हा स्वागतार्ह योगायोग आहे. दातेंची झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, कर्तव्याप्रती असलेली निष्ठा आणि कुठल्याही दबावाला बळी न पडता शांतपणे परिस्थिती हाताळत त्यातून व्यवस्थात्मक बदल घडवण्याचे कौशल्य यांची दखल घेत ही निवड झाली आहे.दिल्लीत महाराष्ट्रातील सनदी आणि पोलिस अधिकाऱ्यांनी आतापर्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. माधव गोडबोले, राम प्रधान, दत्ता पडसलगीकर, ज्युलिओ रिबेरो यांच्या मालिकेत आता सदानंद दाते यांचे नाव सामील झाले आहे. भंडाऱ्याचे पोलिस प्रमुख या नात्याने नक्षलवादाची समस्या हाताळण्यापासून तर मुंबईत आर्थिक गुन्ह्यांची उकल करणाऱ्या आर्थिक गुन्हेगारी तपास पथकापर्यंत त्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. नक्षलवादाच्या आव्हानावर मात करण्यापासून ते मुंबई पोलिस उपायुक्त (कायदा व सुव्यवस्था) असे सगळे अनुभव त्यांना 'एनआयए'च्या महासंचालकपदाची जबाबदारी देण्यापूर्वी निश्चितच विचारात घेतले असणार.सदानंद दाते मुंबईत काम करत असताना २६/११चा हल्ला झाला. खरे तर त्यांच्याकडे त्यावेळी जबाबदारी होती ती मध्य मुंबईची. पण कार्यक्षेत्राचा विचार न करता त्यांनी घरालगतच्या पोलिस ठाण्यात धाव घेतली. तेथून बंदूक, दारुगोळा घेत ते दक्षिण मुंबईच्या परिसरात पोहोचले. कामा रुग्णालय परिसरात शिरलेल्या अजमल कसाब आणि त्याच्या साथीदारांपासून उपचार घेत असलेल्या बालक आणि महिलांचे संरक्षण करण्यासाठी दाते काही तास झुंजत होते. त्यावेळी कसाबने एका व्यक्तीचा ढालीसारखा वापर करत दातेंना टिपायचा प्रयत्नही केला. जखमी झाल्यानंतर त्याही स्थितीत ते झुंज देत राहिले.या हल्ल्याच्या घटनेनंतर दहशतवादाशी मुकाबला करण्यासाठी स्थापन झालेल्या 'फोर्स वन'चे दाते प्रमुख होते. नंतरची काही वर्षे त्यांनी दिल्लीत केंद्रीय गृह मंत्रालयात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. छत्तीसगडच्या परिसरात माओवाद्यांशी दोन हात करण्यासाठी तेथील स्थानिक भाषा अवगत असणाऱ्या तरुणांची जवान म्हणून भरती करण्याच्या प्रस्तावापासून ते त्या भागाच्या विकासाला चालना देणे असे विविधांगी प्रयत्न त्यांनी केले. महाराष्ट्रात परतल्यानंतर कोरोना काळात त्यांना नव्या पदावरील नियुक्तीसाठी काही महिने प्रतीक्षा करावी लागली. त्यानंतर मीरा-भाईंदर या नवनिर्मित पोलिस आयुक्तालयाची जबाबदारी त्यांनी पार पाडली.आयुक्तालयात पोलिस नागरिक संवादावर विशेष भर दिला. हा दृष्टिकोन संपूर्णतः वेगळा होता. 'एनआयए'च्या महासंचालकपदी नियुक्त होण्यापूर्वी ते महाराष्ट्रात दहशतवादविरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुख होते. ठाणे-भिवंडी परिसरातील पडघा येथे 'इसीस'ने सुरू केलेल्या कारवायांचा तपास लावून ते त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने नेस्तनाबूत केले. या कारवायांचा मागोवा घेण्यासाठी 'एटीएस' आणि 'एनआयए'ने संयुक्तरित्या केलेली कारवाई समन्वय आणि सहकार्याचे आदर्श उदाहरण मानले जाते. केंद्र आणि राज्ये यांच्यात विविध पक्षांची, विचारांची सरकारे असताना 'एनआयए'ला मोठ्या कुशलतेने आपली कामगिरी पार पाडावी लागते. गुन्हेगारी कृत्यांचा छडा लावावा लागतो. अशा स्थितीत दाते यांची संयत भूमिका निश्चितच मदतकारक ठरू शकते.अत्यंत प्रतिकुल परिस्थितीशी संघर्ष करत प्रशासकीय सेवेचे क्षेत्र निवडलेल्या सदानंद दाते यांना वाचन, अभ्यासाची विलक्षण आवड आहे. फुलब्राईट स्कॉलरशिप अंतर्गत त्यांनी अमेरिकेत जावून तेथील 'व्हाईट कॉलर्ड' गुन्हेगारीचा अभ्यास केला. पोलिस कल्याण निधीतून कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाला मोठा हातभार लावला आहे, त्यांच्या हाताखालील कर्मचारी त्यांचा त्याबाबत आदराने उल्लेख करतात. पोलिस वर्दीतल्या अनुभवांवर त्यांनी लिहिलेले पुस्तक 'वर्दीतल्या माणसाच्या नोंदी' वाचकप्रिय आहे.जगावर दहशतवादाची छाया अधिकाधिक गडद होत आहे. जम्मू-कश्मीरमधील घुसखोरी, पंजाबसारख्या राज्यातला अमली पदार्थाचा व्यापार, ईशान्येतील राज्यांतील उलथापालथी यांसह अनेक आव्हाने आहेत. अशा वेळी देशांतर्गत तसेच सीमेपलीकडून देशाच्या सुरक्षेसमोर आव्हान ठरणाऱ्या कारवायांचा नि:पात करणे फार महत्त्वाचे आहे. ते हाताळण्यासाठी मराठी अधिकाऱ्याला राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेच्या महासंचालकपदी नेमले जाणे, ही अभिमानाची बाब आहे.

# बरंच काही शिकायचे...

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आजवरच्या जगण्यात काही गोष्टी करून झाल्या. मात्र, काही गोष्टी करायची इच्छा अजूनही कायम आहे. त्या पूर्णत्वाला जातील अशी मला खात्री आहे. यामध्ये विमानप्रवासासह, साहित्यवाचन आणि नवीन भाषा शिकणे यांचा समावेश होतो. या इच्छा पूर्ण करून मला भारतीय संस्कृतीशी नाळ आणखी मजबूत करायची आहे. त्याबाबतचा हा छोटासा ऊहापोह.माझी पहिली इच्छा म्हणजे विमानप्रवास होय. लहानपणी हवाई जहाज व विमान त्याचे केवळ चित्र मी अंकलीपीत पाहिलेले आहे. परंतु, आजच्या या प्रगत जगात विमानप्रवास हा अतिशय सुखकर व सुलभतेने करता येतो. तेव्हा पुढे भविष्यकाळात मला विमानप्रवास करावयाचा असून, जगातील काही देश तसेच भारतातील काही प्रेक्षणीय स्थळे बघून जीवन आनंदमयी करायचे आहे. एक गोष्ट मी निश्चितपणे करणार आहे. आता दुसरी इच्छा म्हणजे, मला एखादी नवीन भाषा शिकायची आहे. त्यात मला मराठी, हिंदी, इंग्रजी या तिनही भाषा येतात. तसेच शाळेत असताना माझा संस्कृत विषय असल्याने मला त्याचेही ज्ञान आहे. तर मला आता नवीन भाषा शिकायची आहे. आजकाल मुलांचा नवीन भाषा शिकण्याकडे कल आहे. ते सर्व ऐकून मी अस ठरवले आहे की मला आता जर्मनी भाषा शिकायची इच्छा आहे. कुठलीही नवीन गोष्ट शिकल्यानंतर आपल्या ज्ञानात भर पडते.म्हणतात ना, 'माणूस हा कायम विद्यार्थी असतो आणि त्याने नेहमी शिकत राहिले पाहिजे'. तसेच मी करणार असून, आता लवकरच क्लास शोधून जर्मन भाषा शिकणार आहे. तिसरी इच्छा म्हणजे साहित्यवाचन. मला मराठी साहित्यातील महनीय लेखक विकास पाटील, पु. ल. देशपांडे, वसंत सबनीस, व. पू. काळे, प्र. के. अत्रे यांनी लिहिलेली मराठी कादंबरी व पुस्तके वाचन करण्याची इच्छा राहून गेली आहे. ती मला लवकरात लवकर पूर्ण करायची आहे. कारण, 'वाचाल तर वाचाल'.



# उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसमधील तणावाचे कारण शरद पवार
## एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांचा आरोप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

सांगली लोकसभा मतदारसंघातून दिलेल्या उमेदवारीमुळे उद्धव ठाकरे यांच्या गटाबाबत काँग्रेसच्या नेत्यांमध्ये चांगलीच नाराजी पसरली आहे. काँग्रेसचे नेते उघडपणे उद्धव ठाकरे गटावर टीका करत आहेत. मात्र, ही सर्व शरद पवार यांची खेळी असल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.

सांगली लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाच्या पक्षाचे अस्तित्व नाही. ती जागा ते कधी लढले नाहीत, त्या जागेवर ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये तिढा कसा काय निर्माण होईल? मुळात हा तिढा निर्माण व्हावा म्हणून ही ठरवून खेळी केली, असा आरोप आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.शरद पवार यांनी ठाकरे गटाने काँग्रेसमध्ये भांडण लावले असल्याचे देखील ते म्हणाले. ही शरद पवारांची खेळी असून त्यांनी केलेल्या खेळीमध्ये उद्धव ठाकरे यांचा गट अडकला असल्याचा दावा त्यांनी केला आहे.उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने सांगली लोकसभा मतदारसंघातून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. ठाकरे या जागेसाठी आग्रही होते मात्र, काँग्रेस पक्षाने या मतदारसंघावरील आपला दावा अद्याप सोडलेला नाही. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा असताना तो मतदार संघ काँग्रेसला सोडण्यात आला आहे. त्या बदल्यात शिवसेनेला सांगली लोकसभा मतदारसंघ देण्यात यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्या गटाने केली होती. मात्र, काँग्रेस पक्षातील स्थानिक पदाधिकारी तसेच राज्य पदाधिकारी देखील या मागणीसाठी मान्य नव्हते. या विषयी दोन्ह पक्षातील नेत्यांमध्ये चर्चा सुरू असताना देखील उद्धव ठाकरे यांनी सांगली लोकसभा मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते उद्धव ठाकरे यांच्यावर जाहीरपणे टीका करत आहेत.काँग्रेस पक्षाचे नेते विशाल पाटील हे सांगली लोकसभा मतदारसंघातून आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करत होते. त्यांना ही उमेदवारी देण्यात यावी यासाठी विश्वजीत कदम हे देखील आग्रही होते. स्थानिक सर्व पदाधिकारी सांगली लोकसभा मतदारसंघासाठी आग्रही असताना राज्यपातळीवरील नेते देखील सांगली लोकसभा मतदारसंघ ठाकरे गटाला सोडण्यास इच्छुक नव्हते. या संदर्भात दोन्ही पक्षाच्या नेत्यांमध्ये चर्चा सुरू होती. मात्र असे असताना शिवसेनेच्या वतीने अचानक यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये सांगली लोकसभा मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देखील जाहीर करण्यात आली. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये चांगलाच तणाव निर्माण झाला आहे. या तणावाचे मुख्य कारण हे शरद पवार असल्याचा आरोप आमदार संजय शिरसाट यांनी केला असल्याचा दावा माध्यमांशी बोलताना केला आहे.



# उदयनराजेंना तिकीट देणार का?:पत्रकारांचा प्रश्न ऐकताच शरद पवार यांनी उडवली कॉलर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सातारा (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी पुढील २ दिवसांत सातारा लोकसभा मतदार संघाचा उमेदवार जाहीर करण्याची घोषणा केली. यावेळी पत्रकारांनी त्यांना महायुतीने उदयनराजेंना तिकीट दिले नाही तर तुम्ही देणार का? असा प्रश्न केला असता त्यांनी हसत आपली कॉलर उडवली. तसेच सातारकर फारच चाणाक्ष आहेत, असे सूचक उत्तर दिले.भाजपचे राज्यसभा सदस्य उदयनराजे भोसले सातारा लोकसभेची निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. यासाठी त्यांनी दिल्लीत ३ दिवस



तळ ठोकला. त्यानंतर त्यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट झाली. त्यानंतर त्यांचे साताऱ्यात जंगी स्वागत केले. पण भाजपने त्यांना अद्याप उमेदवारी घोषित केली नाही. या पार्श्वभूमीवर पत्रकारांनी गुरुवारी साताऱ्याच्या दौऱ्यावर असणाऱ्या शरद पवार यांना उदयनराजेंना उमेदवारीविषयी प्रश्न केला. महायुतीने उदयनराजे यांना अद्याप तिकीट दिले नाही. त्यामुळे त्यांनी तुमच्याशी संपर्क साधला तर त्यांच्याशी बोलणार का? असा प्रश्न पत्रकारांनी पवारांना केला. त्यावर पवारांनी तूर्त तरी तशी कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट केले.त्यावर पत्रकारांनी शरद पवारांना मग तुम्ही कॉलर उडवणार का? असा उलटप्रश्न केला. त्यावर पवारांनी पत्रकार परिषदेतच आपली कॉलर उडवून दाखवली. त्यामुळे पत्रकार परिषदेत एकच हशा पिकला. त्यानंतर पवार म्हणाले की, उदयनराजे आता भाजपत आहेत. २ दिवसांपूर्वीच सातारा शहराने त्यांचे संपूर्ण रस्त्यात स्वागत केल्याचे पाहिले. त्यामुळे त्यांनी आमच्याशी संपर्क साधण्याचा प्रश्नच येत नाही.

# आम्ही शंभर पावले चालतोय, तुम्ही आहे त्या जागेवर तरी थांबा–सुषमा अंधारे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

वंचित बहुजन आघाडीची मुंबईमध्ये सभा झाली त्यावेळी उद्धव ठाकरे यांना निमंत्रण का दिले नाही? असा प्रश्न उपस्थित करत उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यावर टीका केली आहे. आम्ही शंभर पावले चालतोय मात्र, तुम्ही आहे त्या जागेवर तरी थांबा, अशा शब्दात सुषमा अंधारे यांनी प्रकाश आंबेडकर यांनी संजय राऊत यांच्यावर केलेल्या आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे.संजय राऊत यांनी आमच्या



पाठीत खंबीर खंजीर खुपसला असून अकोल्यातून त्यांनी आम्हाला पाडण्याचा कट रचला असल्याचा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला होता. संजय राऊत खोटे बोलत असल्याचे म्हणत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाविकास आघाडीतील समावेशावर प्रतिक्रिया देण्यात आली होती. प्रकाश आंबेडकर यांच्या या टीकेला खासदार संजय राऊत यांनी देखील प्रत्युत्तर दिले होते. प्रकाश आंबेडकर यांच्याशी मी नव्हे तर महाविकास आघाडी चर्चा करत होती. आंबेडकर यांच्या सोबत झालेल्या चर्चेमध्ये स्वतः शरद पवार आणि उद्धव ठाकरे देखील होते. त्यामुळे माझ्यावर खापर फोडण्याचे काहीच कारण नसल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले होते.सांगली लोकसभा मतदारसंघावरून काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट यांच्यामध्ये वाद सुरू आहे. या संदर्भात देखील सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अकोला आणि रामटेकची जागा काँग्रेसला गेल्यामुळे सांगलीची जागा शिवसेनेकडे आल्याची माहिती सुषमा अंधारे यांनी दिली. दोन्ही पक्षांमध्ये कोणतेही वाद नाही. हे जाणून-बुजून दाखवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आमच्यामध्ये छोटे-मोठे वाद होते मात्र, ते मिटतील असा विश्वास देखील सुषमा अंधारे यांनी व्यक्त केला.

# सुधारित अवजारांचा वापर करुन वेळेची बचत करावी–कुलगुरु डॉ. इंद्र मणि

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

परभणी (वृत्तसंस्था)

योजनेद्वारे हस्तांतरीत सुधारित शेती अवजारांचा शेतकर्यांनी आपल्या शेतावर प्रत्यक्ष वापर करून कृषि निविष्ठांचा वापर आणि वेळेमध्ये बचत करावी, असे आवाहन कुलगुरु डॉ. इंद्र मणि यांनी केले वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीत



संशोधन प्रकल्प पशु शक्तीचा योग्य वापर विभागाच्या वतीने अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण व मूल्यवर्धन दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम व सुधारित शेती अवजाराचे हस्तांतरण कार्यक्रम २७ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. इन्द्र मणि हे होते. तरप्रमुख अतिथी म्हणून संचालक संशोधन डॉ. जगदीश जहागीरदार, संचालक शिक्षण डॉ. उदय खोडके यांच्यासह विद्यापीठ अभियंता दिपक कशाळकर, डॉ. राहुल रामटेके, डॉ. चंद्रकांत लटपटे यांची उपस्थिती होती अध्यक्षीय भाषणात बोलताना कुलगुरू इन्द्र मणि म्हणाले की, सुधारित शेती अवजारे ही शेतकर्यांचे श्रम कमी करून शेती उत्पादनवाढीस फायदेशीर ठरतील, तसेच आपल्या गावातील सोबतच इतर शेतकर्यांना या अवजारे व सुधारित तंत्रज्ञानाचा लाभ द्यावा. पिकाचे उत्पादन वाढीसाठी आवश्यक अवजारांबाबत संशोधन करण्यासाठी शास्त्रज्ञांना आपल्या प्रतिक्रिया देवून प्रोत्साहित करावे. विद्यापीठ शेतकर्यांच्या हितासाठी सतत कार्य करते आणि भविष्यातही आपल्या पाठीशी राहील असे नमूद केले.प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाच्या आयोजिका तथा संशोधन अभियंता डॉ. स्मिता सोळंकी यांनी उपस्थित शेतकर्यांना सुधारित अवजारे तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी अन्नदाता पुरुष बचत गट, प्रकाशवाट शेतकरी उत्पादक कंपनी, आजेगाव, यशोधरा बचत गट, शिंदेफळ, सावित्रीबाई फुले महिला बचत गट, भिमक्रांती महिला बचत गट, पळशी तसेच वाघजडी (ता. सेनगाव जिल्हा हिंगोली) येथील ६० महिला व पुरुष शेतकर्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. स्मिता सोळंकी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. तुकाराम भुतकार यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. संजय देशमुख, इंजि. अजय वाघमारे, दिपक यंदे आदींनी परिश्रम घेतले.


# पिक विमा,अतिवृष्टी व दुष्काळाचे पैसे शेतकऱ्याच्या खात्यात का जमा केले जात नाहीत?–वसंत मुंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारकडे केंद्र शासनाने स्वतःच्या हिश्याचे पिक विमा ,अतिवृष्टी व दुष्काळाचे पैसे देऊनही जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा शेतकऱ्याच्या हक्काचे पैसे बँकेच्या खात्यात वर्ग करण्यास वेळ का लावतात असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . महाराष्ट्रा मधील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी शासकीय यंत्रणे मार्फत ज्या त्या शेतकऱ्याच्या खात्यामध्ये केंद्र व राज्य सरकारकडून पिक विमा अतिवृष्टीचे दुष्काळाचे अनुदान व विविध शेतकऱ्याला मिळणाऱ्या यंत्रणेद्वारे अनुदानाचे रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे आदेश शासनाकडून असूनही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे वर्ग केले जात नाहीत. प्रत्येक

जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा निष्क्रिय झालेली आहे. राज्यातील जिल्हाधिकाऱ्याचे लक्ष शेतकऱ्याच्या समस्यावर नाही कारण राज्यातील निवडणुका जाहीर झालेल्या असून यंत्रणेद्वारे जी कामे सोपविले असतात ती कामे करण्यास यंत्रणा टाळाटाळ करीत आहे . मार्च एंड जवळ आलेला असतानाही शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग पैसे करण्यास संपूर्ण राज्यातील जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे असा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . शेतकऱ्याच्या बाबतीत केंद्र व राज्य सरकारचे आयात निर्यात धोरण चुकीचे असून गेली तीन वर्षापासून शेतीच्या मालाला भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या खचलेला आहे . शेतकऱ्याकडे शेतीमाल खरीप रब्बीचा तयार झाला की केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे परदेशातील शेतीमाल आयात करून देशातील शेतकऱ्याच्या मालाला कवडीमोल भावाने शेतकऱ्याला माल विकावा लागतो. बाजारपेठे मध्ये



शेतीमालाच्या दरावर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतोय शेतकरी हा आर्थिक दृष्ट्या संपूर्णपणे कमकुवत झालेला आहे .केंद्र व राज्य सरकारची यंत्रणा जबाबदार आहे. शासनाच्या हमी दरापेक्षा कमी भावाने बाजारपेठेत शेतकऱ्याचा माल विक्री केला जात आहे. भात कापूस बाजरी मका मुग शेंगदाणे तीळ मोहरी कांदा भाजीपाला फळे गहू ज्वारी तुरीचे भाव बाजारात पाडले जातात त्यामुळे शेतकरी सर्व बाजूंनी संकटात सापडला आहे. केंद्र सरकारने शेती मालाला स्वामीनाथन आयोगचा किमान आधारभूत हमीभावाचा आधार द्यावा कारण शेतीवरील खते बी बियाणे कीटकनाशके औषधी मजुरी दैनंदिन शैती उत्पादन खर्च लाईट बिल जीएसटी कर किरकोळ खर्च नैसर्गिक संकटे त्यामुळे शेती ही शेतकऱ्याला परवडत नाही.अतिवृष्टीचे, दुष्काळाचे अनुदान व पिक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावेत. राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी मार्च एंड च्या आत पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केले नाही तर जिल्हाधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेमध्ये अकार्यक्षम अधिकारी अशी नोंद करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली .

# पथक प्रमुखांनी उमेदवारांच्या खर्चाचा अचुक हिशोब ठेवावा–निवडणुक निरीक्षक अनुराग चंद्रा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

परभणी (वृत्तसंस्था)

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची आदर्श आचारसंहिता मतदार संघात लागू झाली असून, उमेदवारांमार्फत नामनिर्देशन पत्रेही दाखल होणार आहे. त्याअनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा मतदार संघासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक पथक प्रमुखाने उमेदवाराच्या दैनंदिन खर्चाचा अचूक हिशोब ठेवावा, असे निर्देश निवडणूक निरिक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांनी दिल्या.



भारत निवडणूक आयोगाने १७-परभणी लोकसभा मतदार संघासाठी भारतीय महसूल सेवेतील अधिकारी अनुराग चंद्रा यांची निवडणूक निरिक्षक (खर्च) म्हणुन नियुक्ती केली आहे. श्री. चंद्रा यांचे कालच परभणी येथे आगमन झाले. आज त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात १७-परभणी लोकसभा मतदार संघातील निवडणूक खर्च विषयक कामांचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधिक्षक रविंद्रसिंग परदेशी, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, जिपचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, अपर पोलीस अधिक्षक यशवंत काळे, मनपा आयुक्त तृप्ती सांडभोर, राज्य उत्पादन शुल्कचे अधिक्षक गणेश पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जनार्धन विधाते, प्रकल्प संचालक रश्मी खांडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी श्री. चंद्रा म्हणाले की, लोकसभा निवडणूक ही निष्पक्ष व निर्भय वातावरणात मतदान पार पाडण्यासाठी सर्व पथकांनी समन्वयाने काम करावे. निवडणूक कालावधीत मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी कपडे, दारू तसेच पैशांची वाहतूक होण्याची शक्यता असते. त्या अनुषंगाने व्हीएसटी, व्हीव्हीटी आणि एसएसटी पथकांनी व्यवहारांवर लक्ष ठेवण्याचेही त्यांनी निर्देश दिले. मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर होणारा प्रचार पाहता त्याबाबतीत खर्चाची नियमित माहिती प्रसार माध्यम कक्षाने उपलब्ध करून द्यावी. सर्व पथक प्रमुखांनी खर्चाच्या नोंदी अचूक घेऊन जिल्हास्तरीय निवडणूक खर्च नियंत्रण समितीला नियमीत अहवाल सादर करावा. लोकसभा मतदार संघाची निवडणूक ही निष्पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयांनी कार्य करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.प्रारंभी श्री. चंद्रा यांनी सर्व पथक प्रमुखांचा परिचय करुन घेतला. तसेच विविध विषयांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिका-यांशी संवाद साधून पुर्वतयारीचा आढावा घेतला.त्यानंतर श्री. चंद्रा यांनी लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्थापित करण्यात आलेले प्रसार माध्यम कक्ष, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण कक्ष, नियंत्रण कक्ष, सी-विजील कक्ष, आदर्श आचारसंहिता कक्ष, खर्च कक्षांना भेटी देवून कामकाजाची माहिती देत सूचना दिल्या.

# गजानन (बप्पा) घरत यांचे स्वखर्चातून पाण्याचे टँकर सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड प्रतिनिधी

मौजे साखरे बोरगाव या गावातील पाण्याचा प्रश्न तीव्र निर्माण झाला आहे या ठिकाणी विहिरी व बोरला पाणी कमी झाल्यामुळे या ठिकाणी पाण्याचा प्रश्न मोठा भेडसावत असल्याकारणाने या गावचे सरपंच गजानन बाप्पा घरत यांनी अनेक वेळा पंचायत समिती ला ग्रामपंचायत ठराव घेऊन पाठविण्यात आले आहे परंतु अद्यापही पंचायत समिती याकडे दुर्लक्ष करत असताना शेवटी गावातील लोकाला पाण्याचा त्रास झाला नाही पाहिजे या कारणामुळे साखरे बोरगाव या ठिकाणी सरपंच गजानन बप्पा घरात यांनी स्वखर्चातून पाण्याचे टँकर चालू करून गावचा प्रश्न पाण्याचा तात्पुरता मार्गी लावल्यामुळे अनेक गावकऱ्याकडून गजानन बप्पा घरात यांचे अभिनंदन करण्यात येत



आहे.

ग्राम सदस्य -श्रीकांत जगदाळे ,शंकर झनझन, बाबासाहेब नाईकवाडे, रमेश जाधव, आनंद डोळस, अशोक गाडवे व विजय घरत, विजय नाईकवाडे ,लखन कागदे ,पप्पू डोळस, अशोक वाघमारे, रमेश कदम समस्त गावकरी मंडळींना अभिनंदन केले आहे

# लोकशाहीच्या उत्सवात युवकांनी उत्स्फूर्त सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलडाणा । ज्ञानेश्वर बुधवत

विद्यार्थीदशेपासूनच युवकांना देशातील निवडणूक प्रक्रिया, मतदानाचा अधिकाराची माहिती करुन देणे, तसेच मतदार नोंदणी आणि विविधस्तरावरील निवडणूक कार्यक्रमाबद्दल ज्ञान वृद्धींगत करण्यासाठी जिल्ह्यातील ३५३ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि वरिष्ठ महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात आले आहेत.

सशक्त लोकशाही व्यवस्थेसाठी निवडणूक प्रक्रिया, मतदार नोंदणी आणि जाणीव जागृती यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहेत. भारतीय निवडणूक प्रक्रियेविषयी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करुन लोकप्रतिनिधी आणि मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वृद्धींगत करण्यात येत आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सदर मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

या मंडळामध्ये नववी ते पदवी शिक्षणासाठी प्रवेशित सर्व विद्यार्थी सदस्य म्हणून सहभागी राहणार आहे. प्रामुख्याने १८ ते २१ वयोगटातील विद्यार्थी विशेष लक्ष्य असणार आहे. सदर मंडळाला शाळा किंवा शैक्षणिक संस्थेचे नाव देण्यात आले आहे. प्रत्येक शाळा, महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंच स्थापीत करण्यात येत आहेत. तसेच त्यासाठी शाळेतील अथवा महाविद्यालयातील निवडणूक प्रक्रियेत प्रत्यक्ष काम केलेल्या जाणकार शिक्षकाची प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे. शिक्षकांची निवड करताना राज्यशास्त्राचे अथवा विविध निवडणुकांमध्ये कर्तव्य बजावण्याचा अनुभव असणाऱ्या शिक्षकांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यांना निवडणूक साक्षरता मंचाचे निमंत्रक असे संबोधन्यात येत आहे. जिल्ह्यात एकूण ६०२ शिक्षक निमंत्रक आणि सहनिमंत्रक म्हणून निश्चित करण्यात आले आहेत.संबंधित शाळा-महाविद्यालयातील वय वर्षे १५ ते २१ या वयोगटातील सर्व विद्यार्थी या मंडळाचे सदस्य असणार आहेत. निवडणूक साक्षरता मंडळातर्फे आयोजित उपक्रमांच्या संनियंत्रणासाठी सर्व सदस्य विद्यार्थ्यांमधून एक कार्यकारी समिती गठीत करण्यात आली आहे. यात विद्यार्थ्यांची नवमतदार नोंदणी झाली असलेल्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. सदर निवडणूक साक्षरता मंडळाचा कालावधी किमान एक वर्ष अथवा दोन वर्षांपर्यंतचा असणार आहे. या कार्यकारी समितीच्या माध्यमातून सर्व इयत्ताच्या वर्गांमधून निवडणूक प्रक्रिया व मतदार जाणीव जागृतीसाठी विविध कल्पक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील नवमतदार आणि संभाव्य युवा मतदारांनी भारतीय लोकशाही व्यवस्थेचा गौरव वाढविण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे.

# भाजपचा खोटारडेपणा निवडणुकीच्या माध्यमातून मतदार दाखवून देतील-खा.संजय जाधव

## परतुर मतदारसंघातील शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी पदाधिकारी-कार्यकर्त्यांची मंठा येथे बैठक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**रमेश देशपांडे । मंठा**







मोदी सरकारच्या कार्यकाळात ई डीच्या चौकशी लावून देशात व राज्यात फोडाफोडीचे राजकारण केले. उद्योगपतींचे कर्ज माफ करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना बगल दिली. या निवडणुकीत भाजपचा लबाडपणा जनता मतदानातून दाखवून देतील. असा विश्वास परभणी लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार खा. संजय जाधव यांनी व्यक्त केला. परतूर मतदार संघातील शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक रविवार (ता. ३१) रोजी सरस्वती मंगल कार्यालय येथे पार पडली. या बैठकीला महाविकास आघाडीचे उमेदवार खा. संजय जाधव यांच्यासह आ. राजेश राठोड, माजी आमदार शिवाजीराव चोथे, सुरेशकुमार जेथलिया, संतोष सांबरे, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए.जे.पाटील बोराडे, उपसभापती गोपाळराव बोराडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात, ड. अन्वर देशमुख, ड.पंकज बोराडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब तेलगड, माधवराव कदम, अंकुशराव अवचार, दत्तप्रसाद बनसोडे, अण्णासाहेब खंदारे, संभाजीराजे खंदारे, बबनराव गणगे, अजय अवचार, सुदर्शन सोळंके, बाबा गाडगे, किसनराव मोरे, प्रकाश घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी खासदार संजय जाधव यांनी सांगितले की, भाजपने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव दिला नाही. सोयाबीन व कापसाला भाव दिला असता तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा सन्मान झाला असता. त्यांच्या कार्यकाळात प्रचंड प्रमाणावर महागाई वाढली, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी संपूर्ण कर्जमाफी केली, भाजपने मात्र शेतकऱ्यांना देशोधडीला लावले. त्यांना धडा शिकविण्याची हीच खरी वेळ असून शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे, कोणत्याही पक्षाच्या कार्यकर्त्यावर अन्याय होणार नाही अशी ग्वाही दिली. यावेळी आमदार राजेश राठोड यांनी परतूर मतदार संघ हा निस्वार्थ मतदार संघ आहे, इतर मतदारसंघाच्या तुलनेत परतुर विधानसभा मतदार संघातून मतांचा वाढीव वाटा उचलणार असल्याचे सांगितले. लोकसभा निवडणुकीचे समन्वयक तथा माजी आमदार शिवाजीराव चोथे यांनी परभणी लोकसभा निवडणुकीत परतूर मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार संजय जाधव यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले. माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी परतूर मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मतांची लीड मिळेल याची खात्री असल्याचे सांगितले. जातीपातीचे राजकारण बाजूला ठेवून कार्यकर्त्यांनी काम करावे असे आवाहन केले. शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे पाटील बोराडे म्हणाले की, मागील तीस वर्षापासून परतुर मतदार संघातील जनता ठरवेन तोच खासदार निवडून येतो. भाजपने घराघरात भांडणे लावली, फोडाफोडीचे राजकारण केले, भ्रष्टाचार ईडीच्या माध्यमातून हुकूमशाही सुरू केली, याचा राग व्यक्त करायची हीच वेळ असून गाव पातळीवर कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन केले. बाजार समितीचे उपसभापती गोपाळराव बोराडे म्हणाले की, महाविकास आघाडीचा पहिला प्रयोग मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत झाला. त्यामुळे जनता महाविकास आघाडी सोबतच असल्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी होणार असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ड. अन्वर देशमुख, ड. पंकज बोराडे यांनी मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी केले. या बैठकीला परतूर, मंठा, नेर - सेवली मतदार संघातील शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे सूत्रसंचालन सतीश खरात व तुळशीराम कोहिरे यांनी केले.

# कडाडणारी वीज कोरड्या विहिरीत पडली..अन क्षणार्धात आले पाणीच पाणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**




आष्टी तालुक्यातील कडा व परिसरात शुक्रवारी विजेच्या कडकडासह कडा व परिसरात पाऊस असतानाच विजेचा कडकडाट होऊन सायंकाळची साडेपाच वाजता,सर्वत्र पावसाने दमदार हजेरी लावताच तेवढ्यात मोठा कडकडाट होऊन अमोलक जैन संस्थेच्या ५० वर्षापूर्वी खोदलेल्या कोरड्या विहिरीत विज कोसळली.अन् दैवी चमत्कार म्हणावा की काय, बघता बघता अक्षरश: कोरड्या विहिरीत भर उन्हाळ्यात पाणीच पाणी आल्याची चर्चा परिसरात सुरू झाली.

आष्टी तालुक्यात कडा परिसरात शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास वादळी वा-यासह विजेचा कडकडाट सुरु झाला.अन् दमदार पावसाने हजेरी लावली.घराकडे वाट करण्यासाठी नागरीकांची पळापळ चालू असतानाच, तेवढ्यात विजेचा मोठा कडकडाट झाला अन् माहिती घेतली असता समजले की श्री. अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या परिसरातील पन्नास वर्षापूर्वीच्या कोरड्या पडलेल्या एका विहिरीत ती विज कोसळली. अवघ्या काही क्षणातच हा दैवी चमत्कार म्हणावा की काय, असाच अद्भूत प्रकार निदर्शनास आला. अक्षरश:या मार्चच्या तप्त उन्हाळ्यात त्या कोरड्या पडलेल्या विहिरीत एक परसभर भरमसाट पाणी पाहायला मिळाले. देवाची करणी अन् विहिरीत बघता बघता पाणीच पाणी झाले. त्या विहिरीत आलेलं पाणी पाहण्यासाठी मात्र अनेकांनी गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

# लोहा विधानसभा क्षेत्रातील १ हजार ६७६ कर्मचाऱ्यांचे ४ एप्रिलला पहिले प्रशिक्षण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लातूर लोकसभा मतदार संघात तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी लोहा विधानसभा मतदार संघातील निवडणुकीचे पाहिले प्रशिक्षण ४ एप्रिल रोजी विक्की गार्डन पारडी लोहा येथे सकाळ व दुपार असे दोन सत्रात १ हजार ६७६ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होणार आहे,अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी दिली.लोहा विधानसभा मतदार संघ लातूर लोकसभा (अ.जा) मतदार संघात होतो. ३३० मतदान केंद्र असून लोहा तालुक्यात १८३ तर कंधार मध्ये १४७ मतदान केंद्र आहेत. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार,लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर,कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, निवडणूक नायब तहसीलदार रेखा चामनार, नायब तहसीलदार संजय भोसीकर,अशोक मोकले, परळकर, पाठक तसेच निवडणूकीसाठी समन्वयक मन्मथ थोटे हे निवडणूक तयारी साठी दररोज दहा-बारा तास कामकाज बैठका करत आहेत. पारडी येथील विक्की गार्डन येथे दोन सत्रात सकाळी ९ ते ११व दुपारी १ ते ३ वाजतेच्या दरम्यान निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होणार आहे. ईव्हीएम मतदान यंत्र हाताळणी नारायणा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुल लोहा येथे दुपारी १ ते ३ व दुपार सत्रात ३ ते ५ असे प्रशिक्षण होणार आहे.

मतदान केंद्राध्यक्ष ४०० मतदान अधिकारी एक कर्मचारी ४२५, मतदान अधिकारी २ व ३ कर्मचारी ८२५ असे १ हजार ६७६ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात झोनल अधिकाऱ्यांचे मंगळवारी प्रशिक्षण पार पडले. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार परळीकर,तहसीलदार गोरे व टीम निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी वेगवेगळ्या बैठका घेत आहेत.समन्वयक मन्मथ थोटे यांचे निवडणूक प्रक्रियेतील काम उल्लेखनीय ठरत आहे,

# जिद्द व चिकाटीमुळे फुलवली जीवन समृद्धी रोपवाटिका-अमोल पवार

### रात्र चा दिवस, दिवसाची रात्र करून रोपवाटिकाची केली जोपासना



लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दानापूर येथील, बाबासाहेब शिवाजीराव पवार, अमोल शिवाजीराव पवार या दोन्ही भावांनी जिद्द व मेहनतीमुळे फुलवली जीवन समृद्धी रोपवाटिका, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध कंपन्याचे बियाण्याची लागवड करून चांगल्या प्रकारची रोपे तयार केली, अमोल शिवाजीराव पवार, बाबासाहेब शिवाजीराव पवार, जीवन समृद्धी रोपवाटिका मध्ये चांगल्या प्रकारची ट्रीटमेंट घेतात म्हणून भोकरदन परिसरामधून शेतकरी बांधव या रोपवाटिकांमध्ये चांगल्या प्रकारची बुकिंग करत असतात.

# अखेर प्रसिद्धीमाध्यमामुळे वाहतूक विभागाला आली जाग आणि अपघातापुर्वीच वाकलेला लोखंडी पोल सरळ केला -डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



बीड शहरातुन जाणा-या धुळे ते सोलापूर महामार्गावरील शिवराज पान सेंटर नावाने ओळखला जाणारा वर्दळीचा मुख्य चौकात दुभाजकावर असणारा दिशादर्शक लोखंडी पोल वाकलेल्या अवस्थेत कित्येक दिवसांपासून तशाच अवस्थेत होता.याविषयी ४ दिवसांपूर्वी अपघात झाल्यानंतरच वाकलेला सरळ पोल सरळ करणार का?? या सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी वाहतूक विभागाला विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने विविध दैनिकात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अखेर प्रसिद्धी माध्यमांमुळे जागे झालेल्या वाहतूक विभागाने पोल सरळ करण्याचे कष्ट घेतल्यामुळे संभाव्य अपघात टळण्यास मदत होणार आहे,

### अवकाळी पावसाचा फळ बागांना फटका

# शासन स्तरावरून तात्काळ मदत करण्याची शेतकऱ्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**



ता.३० शनिवार रोजी रात्री झालेल्या अवकाळी पाऊसाने फळ बागांना चागलाच फटका बसला आहे.त्या मुळे येणाऱ्या काळात फळाचा राजा अंबा,संत्री,मोसंबी,डाळिंब,द्रांश महागणार असल्याचे जाणकार सांगत आहेत.शनिवार रोजी रात्री सुमारे ९:०० ते १०:०० वा.दरम्यान मंठा शहरासह तालुक्यातील पाटोदा, वांजोळा,केदारवाकडी,लिंबे वडगाव, विडोळी,गेवराई, उमरखेड, मुरूमखेड,तळतोंडी, पांगरी,टोकवाडी,या गावात

अचानक सोसाट्याच्या वारा व विजेचा कडकडाटसह अवकाळी पावसाने हजरी लावल्याने परिसरातील फळ बागांचे अतोनात नुकसान झाले असल्याने फळबागायतदार शेतकरी मात्र अडचणीत सापडले असून येणाऱ्या काळात फळांचे दर वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.तालुक्यातील वांजोळा येथील शेतकरी दादासाहेब चव्हान यांच्या शेतातील केसर,दशहरी,हापूस आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सोसाट्याच्या वाऱ्या मुळे झाडाला लागलेली फळे गुळून पडली आहेत.या अगोदर देखील फळ बागांचे नुकसान झाले असताना देखील शासनाने कोणत्याही प्रकारची मदत केली नसल्याचे त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.सोबतच माय बाप सरकारने प्रत्यक्ष पंचनामा करून या वेळी तरी आर्थिक मदत करावी अशी मागणी केली आहे.

# पठाण अलम नशरा याचा पवित्र माहे रमजान मधील पहिला रोजा पूर्ण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



इस्लाम धर्मामध्ये पवित्र माहे रमजान या महिन्याला अनन्य साधारण महत्व आहे. या महिन्यात मुस्लिम बांधव यांच्या वर रोजा(उपवास) फर्ज(बंधनकारक)असतात. लहानापासून ते मोठ्या व्यक्ती पर्यंत पवित्र माहे रमजान महिन्यांमध्ये रोजा धरतात. पालकांना रोजा(उपवास) करतांना पाहून घरातील लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते. आणी त्यामुळे हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा(उपवास)धरतात आणी पूर्ण करतात. अशाच प्रकारे बालेपीर बीड येथील अल्फा इलेक्ट्रीक अँड बॅटरी चे मालक पठाण अमजद पटेल यांची पुतणी व पठाण नविदखान हमीदखान यांची मुलगी वय वर्षे ०६ याने आपल्या आयुष्यातील माहे रमजान मधील पहिला रोजा पुर्ण केला आहे. मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या माहे रमजान महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर अन्न व पाणी न घेता हे रोजा(उपवास)ठेवला जातो. सध्या वाढलेल्या तापमानाचा व उष्णतेचा मोठ्या माणसांना देखील खूप त्रास होत असताना त्यात या ०६ वर्षाच्या चिमुकलीने पहिला रोजा ठेवला व पुर्ण केला. त्याचे या बद्दल कुटुंबियांसह, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र परिवाराने कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारामुळे मुलाच्या जीविताला धोका,न्याय देण्याची आईची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**



मलकापूर शहरातील आनंद सोसायटी येथील दुर्गेश भारंबे हा १३ मार्च रोजी मित्रा सोबत दसरखेड कडून मलकापूरकडे येत असताना अपघात झाला स्थानिक नागरिकांनी चोपडे हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले.मात्र डॉक्टर चोपडे यांनी दुर्गेश भारंबे यांचा उपचार केल्याने त्याची तबेत आनखी बिघडली यावेळी मुलांच्या आईने दुर्गेशला बऱ्हाणपूर येथे नेऊन उपचार केले तेव्हा डॉ चोपडे यांनी चुकीचा उपचार केल्याचे लक्षात आले. डॉक्टर चोपडे यांनी चुकीचा उपचार केल्याचे मुलांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. यामुळे मुलगा दुर्गेश भारंबे यांची आई पुनम भारंबे यांनी ३१ मार्च रोजी दुपारी १२ वाजता मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदन देऊन डॉ चोपडे यांच्यावर कारवाई करुन न्याय देण्याची मागणी केली आहे.

मलकापूर तालुक्यातील कुठल्याही रुग्णासोबत डॉक्टरांकडून बेजबाबदार किंवा निष्काळजीपणाने उपचार केला गेल्यास उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आक्रमक होणारं असुन रुग्णांना न्याय मिळेल तोपर्यंत आम्ही लढा देऊ असा इशारा तालुका प्रमुख दिपक चांभारे पाटील यांच्याकडून देण्यात आला आहे .

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904